मा. कोर्ट प्रत

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषणफॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

## प्रथम खबर अहवाल

(बी एन एस एस संहिताच्या कलम 173 अन्वये)

1. District (जिल्हा): अहिल्यानगर P.S. (पोलीस ठाणे): तोफखाना Year (वर्ष): 2026

FIR No. (प्रथम खबर क्र.): 0421 Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 27/05/2026 18:54 वाजता

2. S.No. (अ.क्र.) Acts (अधिनियम) Sections (कलम)

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) Occurrence of offence(गुन्ह्याची घटना):

1 Day (दिवस): सोमवार Date from (दिनांक पासून): 18/05/2026 Date To (दिनांक पर्यंत): 18/05/2026

Time Period (कालावधी): प्रहर ७ Time From (वेळेपासून): 18:55 तास Time To (वेळेपर्यंत): 19:21 तास

(b) Information received at P.S. (पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याचा): Date (दिनांक): 27/05/2026 Time (वेळ): 18:00 तास

(c) General Diary Reference (ठाणे दैनंदिनी संदर्भ): Entry No. (नोंद क्र.): 051 Date and Time (दिनांक आणि वेळ): 27/05/2026 18:51 तास

4. Type of Information (माहितीचा प्रकार): लेखी

5. Place of Occurrence (घटनास्थळ):

1. (a) Direction and distance from P.S. (पोलिस ठाण्या पासून दिशा आणि अंतर): पूर्व, 4 कि.मी. Beat No. (बीट क्र.):

(b) Address (पत्ता): पोलीस मुख्यालय,अहिल्यानगर ,

(c) In case, outside the limit of this Police Station, then Name of P.S. (पोलीस ठाण्याच्या हद्दी बाहेर असल्यास, पोलीस ठाण्याचे नाव):

District (State) (जिल्हा (राज्य)):

6. Complainant / Informant (तक्रारदार / माहिती देणारा):

(a) Name (नाव): राजु बबन आल्हाट

(b) Father's/Husband's Name (वडिलांचे/पतीचे नाव):

(c) Date/Year of Birth (जन्मतारीख / वर्ष): 1988

(d) Nationality (राष्ट्रीयत्व):भारत

(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):

(f) Passport No. (पारपत्र क्र.):

Date of Issue (दिल्याची तारीख ): Place of Issue (दिल्याचे ठिकाण):

(g) ID Details (Ration Card, Voter ID Card, Passport, UID No., Driving License, PAN) (ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पैन कार्ड))

| S. No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्र क्रमांक) |
|---|---|---|

(h) Occupation (व्यवसाय):

(i) Address (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्ता प्रकार) | Address (पत्ता):: |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहिल्यानगर, तोफखाना, अहिल्यानगर, महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहिल्यानगर, तोफखाना, अहिल्यानगर, महाराष्ट्र, भारत |

(j) Phone number (फोन नं.):

Mobile (मोबाइल क्र.): 91-9420896263

7. Details of known / suspected / unknown accused with full particulars (ज्ञात / संशयित / अज्ञात आरोपींचे संपूर्ण तपशील):

Accused More Than (अज्ञात आरोपी एका पेक्षा जास्त असतील तर संख्या): 0

| S. No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address(वर्तमान (पत्ता)) |
|---|---|---|---|---|
| 1 | पोसई जयेश गांगुर्डे | | | 1. नगर तालुका पोलीस स्टेशन,Town/Village (शहर / गाव): अहिल्यानगर,Tehsil (तहसील): Police Station (पोलीस ठाणे): तोफखाना,District (जिल्हा): अहिल्यानगर,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |

8. Reasons for delay in reporting by the complainant / informant ( तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे ):

9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S. No. (अ.क्र.) | Propertty Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (विवरण) | Value(In Rs/-) मुल्य (रु. मध्ये) |
|---|---|---|---|---|

10. Total value of property (In Rs/-) मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये) :

11. Inquest Report / U.D. case No., if any (मरणान्वेषण अहवाल/अकस्मात मृत्यू प्रकरण क्र. जर असल्यास):

| S. No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.) |
|---|---|

12. First Information contents (प्रथम खबर हकिगत):

मी राजु बबन आल्हाट, वय 38 वर्षे, व्यवसाय-नोकरी, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहिल्यानगर, मो.नं. 9420896263, समक्ष तोफखाना पोलीस स्टेशन,जि.अहिल्यानगर येथे हजर राहुन सरकारतर्फे फिर्यादी होवुन फिर्याद देतो की, मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहिल्यानगर येथे पोलीस निरीक्षक या पदावर दिनांक 10/07/2023 पासुन कार्यरत

आहे.दि.18/05/2026 रोजी आम्ही लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,अहिल्यानगर येथे कर्तव्यावर हजर असताना तक्रारदार श्री.संदिप कुनगर यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,अहिल्यानगर येथे समक्ष आमची भेट घेतली त्यावेळी त्यांनी तक्रारीचा आशय सांगुन नगर तालुका पोलीस स्टेशन येथील लोकसेवक लाच मागणी करत असलेबाबत तक्रार सांगितली व ते सदर लोकसेवकास दि. 18/05/2026 रोजी भेटणार असलेबाबत सांगितले.तक्रारदार यांनी सांगितलेल्या तक्रारी नुसार लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियमान्वये गुन्हा होत असल्याने आम्ही तक्रारदार श्री.संदिप कुनगर यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,अहिल्यानगर येथील आमचे कक्षामध्ये थांबण्यास सांगुन गापेनिय कामकाजाकरीता कार्यकारी अभियंता,मुळा पाटबंधारे विभाग,अहिल्यानगर यांचे कार्यालयाकडुन दोन शासकिय कर्मचारी पंच कामगिरीकरीता उपलब्ध करून घेतले व लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,कार्यालयामध्ये हजर झाल्यानंतर नमुद पंचांना आमचे कक्षामध्ये बोलावुन त्यांना एका तक्रारदाराकडे लोकसेवक लाच मागणी करत असलेबावत तक्रारीचा आशय सांगितला व सदर तक्रारदार हे लोकसेवकास दिनांक 18/05/2026 रोजी भेटणार असल्याचे पंचांना सांगुन तक्रारदार यांनी सांगितलेल्या तक्रारीप्रमाणे पुढील कारवाईबाबत माहिती दिली व नमुद दोन्ही पंच साक्षीदार यांना सदर कारवाईमध्ये आपण पंच म्हणुन काम करण्यास तयार आहात काय? याबाबत पंचांची संमती विचारली असता पंचांनी त्यास संमती दिली. त्यानंतर आम्ही तक्रारदार श्री.संदिप कुनगर यांना त्यांचे संपुर्ण नाव व पत्ता विचारला असता त्यांनी त्यांचे नाव संदिप सर्जेराव कुनगर,वय-35 वर्षे,व्यवसाय-शेती,रा.टाकळी लोणार,ता.श्रीगोंदा,जि.अहिल्यानगर असे सांगितले त्यानंतर आम्ही तक्रारदार श्री.संदिप कुनगर यांचे सोबत दोन्ही पंच तसेच सापळा पथकातील पोना काळे, पोकाॅ वाघ, पोकाॅ कुळधर यांची ओळख करून दिली.त्यानंतर आमचे सुचनेवरून पंचांनी तक्रारदार श्री.संदिप कुनगर यांना त्यांची तक्रार विचारली असता त्यांनी मी वरील ठिकाणी कुटुंबासह राहावयास असुन माझे मामा भारत जयवंत पडोळकर हे त्यांच्या कुटुंबासह देऊळगांवसिध्दी ता.जि.अहिल्यानगर येथे राहावयास आहे. माझे मामा भारत पडोळकर व त्यांचे कुटुंबातील इतर 15 जणांविरूध्द नगर तालुका पोलीस स्टेशन येथे दि. 11/05/2026 रोजी गुन्हा रजि. नं. 422/2026, भारतीय न्याय संहिता सन 2023 चे कलम 118(1),115(2),324(4),189(2),190,119(2),191(3),119 प्रमाणे गुन्हा दाखल झालेला आहे. सदर गुन्हयाचा तपास नगर तालुका पोलीस स्टेशनचे पी.एस.आय. जयेष गांगुर्डे यांचेकडे आहे. माझे मामा भारत पडोळकर व ईतर 15 जण यांचेविरोधात दाखल असलेल्या गुन्हयाचे संदर्भाने मी दिनांक 15/05/2026 रोजी नगर तालुका पोलीस स्टेशन येथे जावुन पी.एस.आय.जयेष गांगुर्डे यांची भेट घेतली होती तसेच दिनांक 17/05/2026 रोजी मी दाखल असलेल्या गुन्हयाच्या अनुषंगाने पी.एस.आय.जयेष गांगुर्डे यांना भेटण्याकरीता नगर तालुका पोलीस स्टेशन येथे गेलो होतो त्यावेळी पी.एस.आय.जयेष गांगुर्डे यांचे पोलीस मुख्यालय,अहिल्यानगर येथे प्रशिक्षण असल्याने ते पोलीस मुख्यालय,अहिल्यानगर येथे असल्याचे मला समजले त्यावेळी मी नगर तालुका पोलीस स्टेशन मधुन पोलीस मुख्यालय,अहिल्यानगर येथे जावुन पी.एस.आय.जयेष गांगुर्डे यांना भेटलो त्यावेळी पी.एस.आय.जयेष गांगुर्डे माझे मामा भारत पडोळकर यांच्याविरूध्द दाखल असलेल्या गुन्हयासंदर्भात चर्चा केली व त्यांना सदरचा गुन्हा खोटया स्वरूपाचा असल्याचे सांगुन सदर गुन्हयामध्ये मामा भारत पडोळकर यांना तसेच त्यांचे कुटुंबातील नातेवाईकांची नावे विनाकारण टाकल्याचे त्यांना सांगुन सदर गुन्हयात मदत करण्याची विनंती केली असता पी.एस.आय. गांगुर्डे

यांनी माझ्याकडे मामा भारत पडोळकर व ईतर 15 जणांचे दाखल असलेल्या गुन्हयामध्ये मदत करण्यासाठी दोन लाख रूपयांची मागणी केली. तेव्हा आमच्या लक्षात आले की, पी.एस.आय. जयेष गांगुर्डे हे माझ्याकडे माझे मामा भारत पडोळकर व ईतर 15 जणांचे विरोधात दाखल असलेल्या गुन्हयामध्ये मदत करण्यासाठी लाचेची मागणी करीत आहे. तरी मला त्यांना लाच देण्याची ईच्छा नाही. त्यानंतर आम्ही तक्रारदार श्री.कुनगर यांना एक कोरा कागद देवुन त्यावर त्यांनी वर नमुद प्रमाणे सांगितलेली तक्रार स्वःहस्ताक्षरात लिहून देणेबाबत कळविले असता, तक्रारदार यांनी त्यांचे स्वहस्ताक्षरात लिहुन दिली त्यानंतर सदरची तक्रार दोन्ही पंचास वाचण्यास दिली असता ती त्यांनी वाचुन पाहिली.त्या हस्तलिखीत तक्रारीवर तक्रारदार श्री.कुनगर व दोन्ही पंचांनी सहया केल्या. तसेच समक्ष म्हणुन आम्ही सही केली.

त्यानंतर तक्रारदार श्री.संदिप कुनगर यांचे तक्रारीप्रमाणे लोकसेवक गांगुर्डे यांची लाचमागणी पडताळणी करण्याचे ठरले. आम्ही लाचमागणी पडताळणी कारवाईत व्हॉईस रेकॉर्डरचा वापर करण्यात येणार असले बाबत कळवुन त्याच्या वापराबाबत तक्रारदार श्री.संदिप कुनगर व दोन्ही पंचांना माहिती समजावुन सांगितली. त्यानंतर आम्ही व्हॉईस रेकॉर्डरमध्ये एक नविन मेमरीकार्ड घालुन व्हॉईस रेकॉर्डर चालु करून त्या मेमरीकार्डमध्ये काही ही रेकॉर्ड नसल्याबाबत तक्रारदार श्री.संदिप कुनगर व दोन्ही पंचांची खात्री करून दिली.

त्यानंतर लोकसेवक गांगुर्डे यांचा तक्रारदार श्री.संदिप कुनगर यांना फोन येत असल्याने लोकसेवक गांगुर्डे यांना फोन करून भेटिच्या ठिकाणाबाबत माहिती घेण्याचे सर्वानुमते ठरले.लोकसेवक गांगुर्डे व तक्रारदार श्री.संदिप कुनगर यांचेमधील कॉल व्हॉईस रेकॉर्डर मध्ये रेकॉर्ड करण्याचे ठरले त्याप्रमाणे तक्रारदार श्री.कुनगर यांनी त्यांचे .9370775279 या मोबाईल क्रमांकवरून यावर लोकसेवक गांगुर्डे यांच्या 7387450882 या मोबाईल क्रमांकावर कॉल करून फोनचा स्पीकर ऑन करून बोलणे केले त्यावेळी लोकसेवक गांगुर्डे यांनी तक्रारदार श्री.कुनगर यांना पोलीस मुख्यालय,अहिल्यानगर येथील गेटवर बोलावल्याचे निष्पन्न झाले.त्यानंतर आम्ही व्हाईस रेकॉर्डर सुरु करून तो तक्रारदार श्री.संदिप कुनगर यांचे गळयात कोणास दिसणार नाही अशा पध्दतीने अडकवुन तक्रारदार श्री.संदिप कुनगर व पंच नं.1 यांना लोकसेवक गांगुर्डे यांची पोलीस मुख्यालय, अहिल्यानगर येथे भेट घेण्यासाठी 18/55 वा. तक्रारदार श्री. संदिप कुनगर यांचेकडील मोटार सायकलने रवाना केले.त्यानंतर तक्रारदार श्री. संदिप कुनगर व पंच नं. 1 असे 19/21 वा. चे सुमारास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहिल्यानगर येथे परत आले. त्यावेळी आम्ही तक्रारदार श्री.संदिप कुनगर यांचेकडून व्हॉईस रेकॉर्डर ताब्यात घेऊन तो बंद केला. त्यानंतर आम्ही पंच नं. 1 यांना व तसेच तक्रारदार श्री. संदिप कुनगर यांना घडलेल्या घटनेविषयी पंच नं.2 श्री.शेलार यांचे समक्ष विचारले असता पंच नं.1 व तक्रारदार श्री.कुनगर यांनी सांगितले कि,लोकसेवक गांगुर्डे यांनी तक्रारदार श्र.संदिप कुनगर यांचे मामा भारत पडोळकर व ईतर 15 जणांचे विरोधात नगर तालुका पोलीस स्टेशन येथे दाखल असलेल्या गुन्हयामध्ये मदत करण्यासाठी पी.एस.आय.गांगुर्डे यांनी 1,00,000/- रूपये लाचेची मागणी केली व सदर लाच रक्कम स्विकारण्याची संमती दर्शविल्याची हकिगत सांगितली.त्यांनतर आम्ही व दोन्ही पंचानी व्हॉईस रेकॉर्डर मधील फाईल नं.1/2 व्यवस्थीत ऐकुन पाहता,तक्रारदार श्री.संदिप कुनगर व लोकसेवक गांगुर्डे यांचेत झालेल्या संभाषणावरून व पंच नं.1 व तक्रारदार श्री.संदिप कुनगर यांनी सांगितलेल्या हकीकतीवरुन आमची व पंचांची खात्री झाली की,लोकसेवक गांगुर्डे यांनी तक्रारदार श्री.संदिप कुनगर

यांचेकडे त्यांचे मामा भारत पडोळकर व ईतर 15 जणांचे विरोधात नगर तालुका पोलीस स्टेशन येथे दाखल असलेल्या गुन्हयात मदत करण्यासाठी 1,00,000/-रूपये लाचेची मागणी करून दिनांक 19/05/2026 रोजी पोलीस मुख्यालय,अहिल्यानगर येथे दुपारी 01/00 वा. ते 02/00 वा.दरम्यान स्विकारण्याची संमती दर्शविल्याचे निष्पन्न झाल्याने लोकसेवक गांगुर्डे यांचे विरोधात दिनांक 19/05/2026 रोजी सापळा कारवाई आयोजित करण्याचे ठरले त्यानंतर तक्रारदार श्री.कुनगर यांना दिनांक 19/05/2026 रोजी 11/00 वा.आम्ही सांगितलेल्या अहिल्यानगर येथील सुरक्षित ठिकाणी लोकसेवक गांगुर्डे यांनी मागणी केलेल्या लाच रकमेसह हजर राहणेबाबत व झाले कारवाईबाबत गोपनियता राखणेबाबत सुचना देवुन घरी जाण्यात मोकळीक दिली त्यानंतर लाच मागणी पडताळणी पंचनामा पुर्ण झाल्यानंतर पंच व सापळा पथकास झाले कारवाईबाबत गोपनियता राखण्याच्या सुचना दिल्या व दिनांक 19/05/2026 रोजी 10/30 वा.लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,अहिल्यानगर येथे हजर राहण्याच्या सुचना दिल्या.दिनांक 19/05/2026 रोजी आम्ही ला.प्र.वि.कार्यालयात हजर असताना आम्ही दिलेल्या सुचनेप्रमाणे पंच व सापळा पथक कार्यालयात हजर झाले त्यानंतर सापळा पथकास सापळा कारवाईकरीता आवश्यक साहित्य सोबत घेणेबाबत सुचना देवुन शासकिय वाहनाने अहिल्यानगर येथील सुरक्षित ठिकाणी येवुन तक्रारदार श्री.संदिप कुनगर यांना फोनद्वारे अहिल्यानगर येथील सुरक्षित ठिकाणाची माहिती दिल्यानंतर तक्रारदार श्री.संदिप कुनगर हे त्यांचेकडील दुचाकी वाहनासह सुरक्षित ठिकाणी हजर झाले.त्यानंतर आम्ही तक्रारदार श्री.संदिप कुनगर यांना लोकसेवक गांगुर्डे यांना दयावयाची लाचेची रक्कम हजर करण्यास सांगितले असता, त्यांनी त्यांचे बचतीमधील 1,00,000/- रुपये, त्यात 500/- रुपये दराच्या 200 चलनी नोटा हजर केल्या.आमचे सुचनेवरून तक्रारदार श्री. संदिप कुनगर यांनी हजर केलेली लाचेची रक्कम रूपये 1,00,000/- रूपयांस ॲन्थ्रॉसिन पावडर लावण्याचे ठरले.त्यानुसार सदर नोटांचे नंबर एका को-या कागदावर लिहुन घेतले. त्यानंतर तक्रारदार व पंचाना ॲन्थ्रॉसिन पावडर व अल्ट्राव्हायलेट दिव्याच्या वापर यांच्या गुणधर्माबाबत माहिती देवून प्रात्यक्षिक पोकाॅ/किशोर कुळधर यांना करून दाखविण्यास सांगितले. पोकाॅ/किशोर कुळधर यांनी प्रात्यक्षिक करून दाखवुन तक्रारदार श्री.कुनगर यांनी हजर केलेल्या नोटांना ॲन्थ्राॅसिन पावडर लावली व आमचे सुचनेवरुन पोकाॅ/कुळधर यांनी ॲन्थ्रासिन पावडर लावलेल्या नोटांचा बंडल तक्रारदार श्री.संदिप यांचे पॅन्टच्या पुढील उजव्या बाजुच्या खिशात ठेवले त्यानंतर सापळा कारवाईबाबत तक्रारदार श्री.कुनगर,पंच नं.1,पंच नं.2 व सापळा पथकास योग्य त्या सुचना दिल्या.त्यानंतर आम्ही व्हाईस रेकॉर्डरमध्ये नवीन मेमरीकार्ड टाकुन व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन त्यामध्ये कोणतीही फाईल ध्वनीमुद्रीत नसले बाबत पंचाची व तक्रारदार श्री.संदिप कुनगर यांची खात्री करुन दिली. त्यानंतर लोकसेवक गांगुर्डे पोलीस यांचे विरूध्द पोलीस मुख्यालय, अहिल्यानगर येथे लाचेचा सापळा आयोजित करण्याचे ठरले. त्यानंतर आम्ही व्हाईस रेकॉर्डरमध्ये नवीन मेमरीकार्ड टाकुन व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन त्यामध्ये कोणतीही फाईल ध्वनीमुद्रीत नसले बाबत पंचाची व तक्रारदार श्री.कुनगर यांची खात्री करुन दिली. दि. 18/05/2026 रोजी लाच मागणी पडताळणी कारवाई दरम्यान लोकसेवक गांगुर्डे यांनी तक्रारदार श्री. कुनगर यांना फोन करून भेट घेण्याकरीता या असे सांगितले होते त्याप्रमाणे, लोकसेवक कुनगर यांना फोन करण्याचे ठरले व सदरचा कॉल व्हॉईस रेकॉर्डर मध्ये रेकॉर्ड करण्याचे ठरले त्यानंतर आम्ही व्हॉईस रेकॉर्डर चालु केल्यानंतर आमचे सुचनेवरून तक्रारदार श्री. कुनगर यांनी त्यांचे 9370775279 या मोबाईल

क्रमांकावरून लोकसेवक गांगुर्डे यांच्या .7387450882 या मोबाईल क्रमांकावर 13/39 वाजता फोन केला असता लोकसेवक गांगुर्डे यांनी फोन उचलला नाही. त्यानंतर आम्ही लोकसेवक गांगुर्डे यांचा फोन येण्याची वाट पाहिली परंतु बराच वेळ झाला तरी लोकसेवक गांगुर्डे यांचा फोन आला नाही. त्यांनतर पुन्हा लोकसेवक गांगुर्डे यांना कॉल करण्याचे ठरले

व सदर कॉल व्हॉईस रेकॉर्डर मध्ये रेकॉर्ड करण्याचे ठरले त्याप्रमाणे 13/49 वाजता तक्रारदार श्री.कुनगर यांनी त्यांचे 9370775279 या मोबाईल क्रमांकावरून लोकसेवक गांगुर्डे यांच्या 7387450882 या मोबाईल क्रमांकावर फोन केला असता त्यांनी फोन उचलला नाही. त्यानंतर लोकसेवक गांगुर्डे हे फोन उचलत नसल्याने त्यांचा फोन आल्यानंतर पुढील कारवाई करण्याचे ठरले त्याप्रमाणे आम्ही,पंच,सापळा पथक व तक्रारदार श्री.कुनगर असे सुरक्षित ठिकाणी थांबुन राहिलो. त्यानंतर लोकसेवक गांगुर्डे यांचा बराच वेळ झाला परंतु कॉल न आल्याने त्यांना पुन्हा कॉल करण्याचे ठरले व सदरचा कॉल व्हॉईस रेकॉर्डर मध्ये रेकॉर्ड करण्याचे ठरले त्याप्रमाणे आम्ही व्हॉईस रेकॉर्डर चालु करून आमचे सुचनेवरून 19/18 वाजता तक्रारदार श्री.कुनगर यांनी त्यांच्या 9370775279 या मोबाईल क्रमांकावरून यावरून लोकसेवक गांगुर्डे यांच्या 7387450882 या मोबाईल क्रमांकावर फोन केला असता त्यांनी फोन उचलला नाही. त्यानंतर आम्ही रात्री उशीरा पर्यंत लोकसेवक गांगुर्डे यांची फोन येण्याची वाट पाहिली परंतु त्यांचा फोन आला नाही. त्यानंतर लोकसेवक गांगुर्डे हे फोन उचलत नसल्याने त्यांचा फोन आल्यानंतर पुढील कारवाई करण्याचे ठरले त्याप्रमाणे आम्ही,पंच,सापळा पथक व तक्रारदार श्री.कुनगर असे सुरक्षित ठिकाणी थांबुन राहिलो.त्यानंतर बराच वेळ झाला परंतु लोकसेवक गांगुर्डे यांचा फोन न आल्याने तक्रारदार श्री.कुनगर यांनी कळविले कि, लोकसेवक गांगुर्डे हे बुधवारी दिनांक 20/05/2026 रोजी पोलीस स्टेशनला येणार असल्याचे त्यांनी दिनांक 18/05/2026 रोजीच्या लाच मागणी पडताळणी कारवाईदरम्यान झालेल्या भेटिमध्ये सांगितले होते त्याप्रमाणे लोकसेवक गांगुर्डे यांचे विरोधात दिनांक 20/05/2026 रोजी नगर तालुका पोलीस स्टेशन येथे सापळा कारवाई आयोजित करावी व आजची सापळा कारवाई तात्पुरती स्थगित करावी.त्याप्रमाणे दिनांक 19/05/2026 रोजी सापळा कारवाई तात्पुरती स्थगित करून दिनांक 20/05/2026 रोजी लोकसेवक गांगुर्डे यांचे विरोधात सापळा कारवाई आयोजित करण्याचे ठरले.त्यानंतर आम्ही तक्रारदार श्री.कुनगर यांचे पॅन्टचे खिशातील लाचेची रक्कम पोकॉ कुळधर यांचे करवी ताब्यात घेतली.सदर लाचेच्या नोटा एका लिफाफ्यात ठेवून तो लिफाफा चिटकावुन सिलबंद करून सदरचा सिलबंद लिफाफा आम्ही ताब्यात घेवुन सुरक्षित रित्या बॅगेमध्ये ठेवुन दिला.त्यानंतर आम्ही तक्रारदार श्री.संदिप कुनगर यांना सुचना दिल्या की, त्यांनी सदर कारवाईची गोपनियता बाळगावी, तसेच लोकसेवक गांगुर्डे यांनी संपर्क केल्यास तात्काळ आम्हास संपर्क करावा व दिनांक 20/05/2026 रोजी अहिल्यानगर येथील सुरक्षित ठिकाणी दुपारी 12/00 वा हजर रहावे अशा सुचना देवु तक्रारदार श्री.कुनगर यांना घरी जाणेस मोकळीक दिली. त्यांनतर आम्ही दोन्ही पंचाना तसेच सापळा पथकास झाले कारवाई बाबत गोपनीयता बाळगण्याच्या सुचना देवुन पंचांना व सापळा पथकातील अंमलदार यांना दि. 20/05/2026 रोजी 10/00 लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,अहिल्यानगर येथे हजर राहण्याबाबत सुचना दिल्या व सापळा कारवाई पंचनाम्याचे कामकाज पुर्ण केले.त्यानंतर दि. 20/05/2026 आम्ही,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,अहिल्यानगर येथे हजर असताना पंच व सापळा पथक असे कार्यालयात हजर झाले त्यानंतर दोन्ही पंच व सापळा

पथक असे सापळा कारवाईसाठी लागणारे सर्व साहित्यसह शासकिय वाहनाने सुरक्षित ठिकाणी आलो. याठिकाणी तक्रारदार त्यांचेकडील दुचाकी सह हजर झाले त्यानंतर आमचे सुचनेवरून तक्रारदार श्री.संदिप कुनगर हे शासकिय वाहनात बसले. त्यानंतर तक्रारदार श्री.संदिप कुनगर यांनी आम्हाला पंचासमक्ष कळविले कि,त्यांचे मावसभाऊ हे त्यांचे कामानिमित नगर तालुका पोलीस स्टेशन येथे आज सकाळी गेले होते त्यावेळी लोकसेवक गांगुर्डे यांचे दिनांक 20/05/2026 रोजी पावेतो प्रशिक्षण असल्याने ते प्रशिक्षणकरीता पोलीस मुख्यालय,अहिल्यानगर येथे असल्याचे नगर तालुका पोलीस स्टेशन येथे नसल्याचे मावसभाऊ यांनी फोन करून सांगितले आहे.तक्रारदार श्री.संदिप कुनगर यांनी लोकसेवक गांगुर्डे हे नगर तालुका पोलीस स्टेशन येथे नसुन प्रशिक्षणाकरीता पोलीस मुख्यालय,अहिल्यानगर येथे असल्याचे कळविल्यावरून लोकसेवक गांगुर्डे यांचे विरोधात पोलीस मुख्यालय,अहिल्यानगर येथे सापळा कारवाई आयोजित करण्याचे ठरले.त्यानंतर आमचे सुचनेप्रमाणे पोकाॅ कुळधर यांनी सोबत आणलेल्या बॅगेतुन एक सिलबंद लिफाफा काढला. दि. 19/05/2026 रोजी तक्रारदार श्री.संदिप कुनगर यांनी लाच म्हणुन हजर केलेल्या लाचेच्या नोटांना अॅन्थ्राॅसिन पावडर लावण्यात आली होती. त्या नोटा दि.19/05/2026 रोजीच्या स्थगिती पंचनाम्याचे वेळी तक्रारदार श्री.संदिप कुनगर यांचे ताब्यातुन घेवून सिलबंद करण्यात आल्या होत्या. त्या नोटा सापळा कारवाईत वापरावयाच्या असलेबाबत कळविले. त्यानंतर आम्ही व पंचांनी तो लिफाफा तपासुन पाहाता त्यावर आमची व पंचांच्या सहया असून सिल शाबुत असल्याची खात्री केली. त्यानंतर पोकाॅ/कुळधर यांनी तो लिफाफा फोडुन त्यातुन त्या लाचेच्या नोटा बाहेर काढल्या त्या नोटांचे नंबर व दि.19/05/2026 रोजी तक्रारदार श्री.कुनगर यांनी सापळा पुर्व पंचनाम्याचे वेळी हजर केलेल्या नोटांचे नंबर एकच असल्याची आम्ही पंचांची व तक्रारदार श्री.संदिप कुनगर यांची खात्री करुन दिली.त्यानंतर शासकिय वाहनात काळया कपडयाच्या साहायाने जरूर तो अंधार करून, अल्ट्राव्हायलेट दिव्याच्या प्रकाशात त्या नोटा त्यावर अॅन्थ्राॅॅसिन पावडरची चकाकी दिसुन आली. त्यानंतर सदर लाचेच्या नोटा पोकाॅ/कुळधर यांनी तक्रारदार श्री.संदिप कुनगर यांचे पॅन्टच्या समोरील उजव्या बाजुच्या खिशात ठेवुन दिल्या.त्यानंतर तक्रारदार श्री.संदिप कुनगर,पंच नं.1,पंच नं.2 व सापळा पथकास सापळा कारवाईचे अनुषंगाने योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर त्यानंतर लोकसेवक गांगुर्डे पोलीस यांचे विरूध्द पोलीस मुख्यालय, अहिल्यानगर येथे लाचेचा सापळा आयोजीत करण्याचे ठरले. त्यानंतर आम्ही व्हाईस रेकाॅर्डरमध्ये नवीन मेमरीकार्ड टाकुन व्हाॅईस रेकाॅर्डर चालु करुन त्यामध्ये कोणतीही फाईल ध्वनीमुद्रीत नसले बाबत पंचाची व तक्रारदार श्री.कुनगर यांची खात्री करुन दिली. दि. 18/05/2026 रोजी लाच मागणी पडताळणी कारवाई दरम्यान लोकसेवक गांगुर्डे यांनी तक्रारदार श्री. कुनगर यांना फोन करून भेट घेण्याकरीता या असे सांगितले होते त्याप्रमाणे, लोकसेवक कुनगर यांना फोन करण्याचे ठरले व सदरचा काॅल व्हाॅईस रेकाॅर्डर मध्ये रेकाॅर्ड करण्याचे ठरले त्यानंतर आम्ही व्हाॅईस रेकाॅर्डर चालु केल्यानंतर आमचे सुचनेवरून तक्रारदार श्री. कुनगर यांनी त्यांचे 9370775279 या मोबाईल क्रमांकावरून लोकसेवक गांगुर्डे यांच्या 7387450882 या मोबाईल क्रमांकावर 15/27 वाजता फोन केला असता लोकसेवक गांगुर्डे यांनी फोन उचलला नाही. त्यानंतर लोकसेवक गांगुर्डे हे फोन उचलत नसल्याने त्यांचा फोन आल्यानंतर पुढील कारवाई करण्याचे ठरले त्याप्रमाणे आम्ही,पंच,सापळा पथक व तक्रारदार श्री.संदिप कुनगर असे सुरक्षित ठिकाणी थांबुन राहिलो. त्यानंतर लोकसेवक गांगुर्डे यांचा बराच वेळ झाला परंतु काॅल न

आल्याने त्यांना पुन्हा कॉल करण्याचे ठरले व सदरचा कॉल व्हॉईस रेकॉर्डर मध्ये रेकॉर्ड करण्याचे ठरले त्याप्रमाणे आम्ही व्हॉईस रेकॉर्डर चालु करून आमचे सुचनेवरून 19/28 वाजता तक्रारदार श्री.कुनगर यांनी त्यांच्या 9370775279 या मोबाईल क्रमांकावरून यावरून लोकसेवक गांगुर्डे यांच्या 7387450882 या मोबाईल क्रमांकावर फोन केला असता त्यांनी फोन लागला नाही. त्यानंतर आम्ही रात्री उशीरा पर्यंत लोकसेवक गांगुर्डे यांची फोन येण्याची वाट पाहिली परंतु त्यांचा फोन आला नाही. त्यानंतर लोकसेवक गांगुर्डे हे फोन उचलत नसल्याने त्यांचा फोन आल्यानंतर पुढील कारवाई करण्याचे ठरले त्याप्रमाणे आम्ही,पंच,सापळा पथक व तक्रारदार श्री.कुनगर असे सुरक्षित ठिकाणी थांबुन राहिलो.त्यानंतर बराच वेळ झाला परंतु लोकसेवक गांगुर्डे यांचा फोन न आल्याने तक्रारदार श्री.कुनगर यांनी कळविले कि, लोकसेवक गांगुर्डे यांचे आज प्रशिक्षण संपल्यानंतर ते दिनांक 21/05/2026 रोजी पोलीस स्टेशनला येणार असल्याने लोकसेवक गांगुर्डे यांचे विरोधात दिनांक 21/05/2026 रोजी नगर तालुका पोलीस स्टेशन येथे सापळा कारवाई आयोजित करावी व आजची सापळा कारवाई तात्पुरती स्थगित करावी असे कळविल्याने दिनांक 20/05/2026 रोजीची सापळा कारवाई तात्पुरती स्थगित करून दिनांक 21/05/2026 रोजी लोकसेवक गांगुर्डे यांचेविरोधात सापळा कारवाई आयोजित करण्याचे सर्वानुमते ठरले.त्यानंतर आम्ही तक्रारदार श्री.कुनगर यांचे पॅन्टचे खिशातील लाचेची रक्कम पोकॉ/कुळधर यांचे करवी ताब्यात घेतली.सदर लाचेच्या नोटा एका लिफाफ्यात ठेवून तो लिफाफा चिटकावुन सिलबंद करून सदरचा सिलबंद लिफाफा आम्ही ताब्यात घेवुन सुरक्षित रित्या बॅगेमध्ये ठेवुन दिला.त्यानंतर आम्ही तक्रारदार श्री.संदिप कुनगर यांना सुचना दिल्या की, त्यांनी सदर कारवाईची गोपनियता बाळगावी, तसेच लोकसेवक गांगुर्डे यांनी संपर्क केल्यास तात्काळ आम्हास संपर्क करावा व दिनांक 21/05/2026 रोजी अहिल्यानगर येथील सुरक्षित ठिकाणी दुपारी 13/30 वा हजर रहावे अशा सुचना देवु तक्रारदार श्री. संदिप कुनगर यांना घरी जाणेस मोकळीक दिली. त्यांनतर आम्ही दोन्ही पंचाना तसेच सापळा पथकास झाले कारवाई बाबत गोपनीयता बाळगण्याच्या सुचना देवुन पंचांना व सापळा पथकातील अंमलदार यांना दि. 21/05/2026 रोजी 10/00 लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहिल्यानगर येथे हजर राहण्याबाबत सुचना दिल्या व पंचनाम्याचे कामकाज पुर्ण केले.आम्ही लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,अहिल्यानगर येथे हजर असताना आम्ही दिनांक 20/05/2026 रोजी दिलेल्या सुचनेप्रमाणे पंच व सापळा पथकातील अंमलदार असे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहिल्यानगर येथे हजर झाले.पंच व सापळा पथकातील अंमलदारांना आमचे कक्षामध्ये बोलावुन दिनांक 18/05/2026 रोजी झालेल्या लाच मागणी पडताळणी बाबत तसेच दिनांक 19/05/2026,दिनांक 20/05/2026 रोजीच्या सापळा कारवाईबाबत तसेच आज रोजीच्या सापळा कारवाई बाबत माहिती दिली.त्यानंतर आम्ही सोबतचे स्टाफला सापळा कारवाईसाठी लागणारे साहित्य लॅपटॉप, व्हॉईस रेकॉर्डर, मेमरीकार्डस, प्रिंटर, काळे कापड, सिलसाहित्य, पेपर, अॅन्थ्रासीन पावडर, अल्ट्राव्हायोलेट दिवा इ. बरोबर घेणेबाबत सुचना दिल्या. त्यानंतर आम्ही, पंच व सापळा पथकातील कर्मचारी असे सर्व साहित्यासह आमचेकडील खाजगी वाहन क्रमांक एम एच 14,ई वाय-4136 ने 13/15 वा. चे सुमारास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहिल्यानगर कार्यालयातुन निघुन अहिल्यानगर येथे सुरक्षीत ठिकाणी आलो त्यानंतर त्यानंतर आम्ही थांबलेल्या सुरक्षित ठिकाणी तक्रारदार श्री.संदिप कुनगर हे 13/45 वा.चे सुमारास त्यांचेकडील दुचाकीसह पोहचले.त्यानंतर आमचे सुचनेवरून तक्रारदार हे खाजगी वाहनात बसले. त्यानंतर आमचे

सुचनेप्रमाणे पोकाॅ कुळधर यांनी सोबत आणलेल्या बॅगेतुन एक सिलबंद लिफाफा काढला. दि. 19/05/2026 रोजी तक्रारदार यांनी लाच म्हणुन हजर केलेल्या लाचेच्या नोटांना अॅन्थ्राॅसिन पावडर लावण्यात आली होती. त्या नोटा दि.20/05/2026 रोजीच्या स्थगिती पंचनाम्याचे वेळी तक्रारदार यांचे ताब्यातुन घेवून सिलबंद करण्यात आल्या होत्या. त्या नोटा सापळा कारवाईत वापरावयाच्या असलेबाबत कळविले. त्यानंतर आम्ही व पंचांनी तो लिफाफा तपासुन पाहाता त्यावर आमची व पंचांच्या सहया असून सिल शाबुत असल्याची खात्री केली. त्यानंतर पोकाॅ कुळधर यांनी तो लिफाफा फोडुन त्यातुन त्या लाचेच्या नोटा बाहेर काढल्या. त्या नोटांचे नंबर व दि.19/05/2026 रोजी तक्रारदार श्री. कुनगर यांनी सापळा पुर्व पंचनाम्याचे वेळी हजर केलेल्या नोटांचे नंबर एकच असल्याची आम्ही पंचांची व तक्रारदार यांची खात्री करुन दिली.त्यानंतर खाजगी वाहनात काळया कपडयाच्या साहायाने जरूर तो अंधार करून, अल्ट्राव्हायलेट दिव्याच्या प्रकाषात त्या नोटा त्यावर अॅन्थ्राॅॅसिन पावडरची चकाकी दिसुन आली. त्यानंतर

सदर नोटांचे बंडल पोकाॅ कुळधर यांनी तक्रारदार यांचे पॅन्टच्या समोरील उजव्या बाजुच्या खिशात ठेवुन दिल्या.त्यानतर लोकसेवक गांगुर्डे यांचे विरोधात नगर तालुका पोलीस स्टेषन येथे सापळा कारवाई आयोजित करण्याचे ठरले त्याप्रमाणे तक्रारदार श्री.कुनगर,पंच नं.1 श्री.कराळे,पंच नं.2 श्री.शेलार व सापळा पथकास सापळा कारवाईबाबत योग्य त्या सुचना दिल्या.त्यानंतर आम्ही व्हाॅईस रेकाॅर्डर चालू करून तक्रारदार श्री. संदिप कुनगर यांचे गळयात अडकवुन कोणास दिसणार नाही अशा पध्दतीने अडकवुन तक्रारदार यांना पंच नं.1 श्री.अक्षय कराळे यांचेसह लोकसेवक गांगुर्डे यांची भेट घेण्याकरीता नगर तालुका पोलीस स्टेशन येथे जाण्यासाठी तक्रारदार यांचेकडील दुचाकी वरून रवाना केले. ती वेळ 14/32 वा. ची होती. मागोमाग आम्ही, पंच नं. 02 श्री.ईश्वर शेलार, व सापळा पथक खाजगी वाहन क्रमांक एम एच 14,ई वाय 4136 या वाहनाने निघालो. तक्रारदार श्री.कुनगर यांनी त्यांची मोटार सायकल नगर तालुका पोलीस स्टेशन येथे बाहेर असलेल्या आवारात उभी केली. मागोमाग आम्ही, पंच नं.2 व सापळा पथक असे खाजगी वाहनाने आलो व नगर तालुका पोलीस स्टेषन पासुन काही अंतरावर खाजगी वाहनातुन उतरून पायी चालत येवुन नगर तालुका पोलीस स्टेषनच्या परिसरात कोणास काही एक संशय येणार नाही अशा रितीने सापळा लावुन थांबलो. सापळा पथकातील अधिकारी व कर्मचारी आल्याची खात्री झाल्यानंतर तक्रारदार श्री. कुनगर हे पंच नं.1 श्री.अक्षय कराळे यांचेसह नगर तालुका पोलीस स्टेषन मध्ये पायी चालत गेले. त्यांनतर थोडया वेळाने तक्रारदार नियोेजित इशारा न करता नगर तालुका पोलीस स्टेषन येथुन निघुन मोटार सायकलने सुरक्षित ठिकाणी आले. त्यानंतर त्यापाठोपाठ आम्ही व सापळा पथक देखील सुरक्षित ठिकाणी आलो.त्यावेळी आम्ही तक्रारदार यांचेकडील व्हाईस रेकाॅर्डर ताब्यात घेवुन बंद केले. त्यावेळी व्हाईस रेकाॅर्डरमध्ये 1/1 अशी फाईल तयार झाल्याचे दिसुन आले. ती वेळ 15/35 वा.चे सुमाराची होती. त्यानंतर आम्ही पंच नं. 1 श्री.अक्षय कराळे यांना पंच क्र. 02 श्री.ईष्वर षेलार यांचे समक्ष त्यांना तक्रारदार श्री.कुनगर यांचेसह रवाना केलेपासुन परत येई पर्यंत घडलेल्या घटनाक्रमाबाबत विचारले असता त्यांनी सांगितले की, आपण मला तक्रारदार यांचेसह रवाना केल्यानंतर आमचे मागोमाग आपण, पंच नं. 2, सापळा पथकातील अधिकारी व कर्मचारी असे नगर तालुका पोलीस स्टेषनच्या आवारात कोणालाही दिसणार नाही अशा पध्दतीने सापळा लावुन थांबले. आपण व सापळा पथक आल्याची खात्री झाल्यानंतर मी व तक्रारदार असे नगर तालुका

पोलीस स्टेषन येथे गेलो. पोलीस स्टेषनमध्ये लोकसेवक गांगुर्डे हे बसत असलेल्या कक्षाचे ठिकाणी गेलो असता सदर कक्षाला लाॅक लावलेले दिसले त्यानंतर तक्रारदार श्री. संदिप कुनगर यांनी त्यांचे मोबाईल नंबर 9370775279 यावरून लोकसेवक गांगुर्डे यांचा मोबाईल नं. 7387450882 यावर फोन केला असता फोनची एक रिंग वाजुन फोन कट झाला. त्यानंतर तक्रारदार श्री.कुनगर यांनी पोलीस स्टेषनमधील पोलीस कर्मचा-यास लोकसेवक गांगुर्डे यांचेबाबत विचारले असता सदर पोलीस कर्मचारी यांनी लोकसेवक गांगुर्डे हे पोलीस स्टेशन येवुन गेल्याचे सांगितले त्यानंतर मी व तक्रारदार श्री.कुनगर असे नगर तालुका पोलीस स्टेषन चे एपीआय वारूळे यांना भेटण्याकरीता त्यांचे केबिन बाहेर थांबलो व थोडया वेळानंतर तक्रारदार श्री.कुनगर एपीआय वारूळे यांचे केबिनमध्ये गेले त्यांचे पाठोपाठ मी देखील केबिन मध्ये गेलो त्यावेळी एपीआय वारूळे व तक्रारदार श्री.कुनगर यांचेमध्ये गुन्हयाचे तपासासंबंधी चर्चा झाली त्यानंतर एपीआय वारूळे यांनी लोकसेवक गांगुर्डे हे पोलीस स्टेषन मध्ये आले नसल्याचे सांगितल्यानंतर मी व तक्रारदार श्री.कुनगर असे रवाना केले त्या ठिकाणी परत आलो, अशी हकीकत सांगितली.त्यानंतर तक्रारदार श्री.संदिप कुनगर यांनी कळविले की, पी.एस.आय.गांगुर्डे यांना माझेबाबत काहितरी संषय आल्यामुळे दिनांक 18/05/2026 रोजी माझेकडे लाचेची मागणी केल्यानंतर दिनांक 19/05/2026 व दिनांक 20/05/2026 रोजीच्या सापळा कारवाई दरम्यान मी त्यांना फोन केल्यानंतर माझा फोन उचलला नाही तसेच मला संपर्क केलेला नाही त्याचप्रमाणे दिनांक 21/05/2026 रोजी नगर तालुका पोलीस स्टेषन येथे सापळा कारवाई दरम्यान त्यांची पंच नं.1 यांचेसह भेट घेण्यास पाठविले असता ते नगर तालुका पोलीस स्टेषनमध्ये नसल्याने भेट झालेली नाही तसेच त्यांना फोन केला असता फोन उचलला नाही. पी.एस.आय.गांगुर्डे हे माझेकडुन भविश्यात लाच स्विकारणार नाहीत यांची मला खात्री झाली आहे. तरी आपण ही सापळा कारवाई पुर्णतः स्थगित करून दि.18/05/2026 रोजी मी नोंदविलेल्या तक्रारीचे अनुषंगाने लाच मागणी पडताळणी कारवाई दरम्यान नगर तालुका पोलीस स्टेषनमधील पी.एस.आय.जयेष गांगुर्डे यांनी माझे मामा भारत जयवंत पडोळकर व त्यांचे घरातील ईतर 15 नातेवाईक यांचे विरोधात नगर तालुका पोलीस स्टेषन येथे दाखल असलेला गुन्हा रजि.नं. 422/2026,भारतीय न्याय संहिता सन 2023 चे कलम 118(1), 115(2), 324(4), 189(2), 190,119(2),191(3),119 प्रमाणे या गुन्हयात मदत करण्यासाठी पंचासमक्ष 1,00,000/- रूपये लाचेची मागणी करून स्विकारल्याची तयारी दर्षविल्याने पी.एस.आय.जयेश गांगुर्डे,नगर तालुका पोलीस स्टेषन यांचे विरूध्द कायदेषीर कारवाई करावी.त्यानंतर आम्ही, तक्रारदार, दोन्ही पंच व सापळा पथक असे पंचनाम्याचे पुढील कामकाज करण्यासाठी खाजगी वाहनाने सुरक्षित ठिकाणाहुन निघुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहिल्यानगर येथे आलो.त्यानंतर आम्ही तक्रारदार श्री. संदिप कुनगर यांनी सापळा कारवाई पुर्णतःस्थगित करणेबाबत वर सांगितलेल्या कारणाप्रमाणे दोन पंचासमक्ष त्यांचा तसा सविस्तर जबाब नोंदवुन घेतला. त्यानंतर सर्वानुमते सदर कारवाई पुर्णतः स्थगित करण्याचे ठरले. त्यानंतर आम्ही तक्रारदार श्री.संदिप कुनगर यांना झाले कारवाईबाबत गोपनियता बाळगण्याच्या सुचना देवुन त्यांना जाणेस मोकळीक दिली व सापळा कारवाई स्थगिती पंचनाम्याचे कामकाज केले.

तरी तक्रारदार श्री.संदिप सर्जेराव कुनगर,वय-35 वर्षे,धंदा-शेती,रा.टाकळी लोणार,ता.श्रीगोंदा,जि.अहिल्यानगर यांनी दिनांक 18/05/2026 रोजी लोकसेवक जयेश गांगुर्डे,पोलीस उप निरीक्षक,नगर तालुका पोलीस स्टेशन हे तक्रारदार यांचे मामा भारत जयवंत पडोळकर व त्यांचे

R.O.A.C. (आर.ओ.ए.सी.)

Registered by (नोंदणी अधिकारी)

Signature of Officer in charge, Police Station
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

Name (नाव): Jagdish Chhaburao

Rank (हुद्दा): I (Inspector) पोलीस ठाणे अंमलदार
तोफखाना पो.स्टेशन
अहिल्यानगर

No. (क्र.):

14. Signature / Thumb impression of the complainant / informant (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा)

15. Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):